Thursday, the 14th March, 2024

G-8115

RNI No. MAIIBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक १(२)] बुधवार, जानेवारी ३, २०२४/पोष १३, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक २

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

	पृष्ठे
सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.	१-३

दिनांक ३ जानेवारी २०२४ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

सतिश वाघोले,
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक ३ जानेवारी २०२४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

२०१७ चा महा. ६. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, २०२३ चा अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २० ऑक्टोबर महा. अध्या. ८. २०२३ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२३ प्रख्यापित केला होता ;

G-8116

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात त्यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १०९ मध्ये,— २०१७ चा महा. ६.

(१) पोट-कलम (३) मधील, खंड (छ) मध्ये, दुसरे परंतुक व तक्ता याऐवजी, पुढील परंतुक व तक्ता दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, २०२४- २०२५ या शैक्षणिक वर्षासाठी, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी इरादा पत्र मागण्याकरिता अर्ज करण्याचे, अधिष्ठात्र मंडळाद्वारे अर्जाची छाननी करण्याचे व ते राज्य शासनाकडे पाठविण्याचे आणि राज्य शासनाकडून इरादापत्र देण्याचे दिनांक वाढविण्याच्या दृष्टीने, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) व (घ) यामध्ये निर्दिष्ट केलेला दिवस किंवा दिनांक हे, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येतील :—

तक्ता

खंड	विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक	२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक
(१)	(२)	(३)
(क)	ज्या वर्षी परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी	१५ नोव्हेंबर २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी ;
(ग)	ज्या वर्षी असा अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाला असेल त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी	३१ डिसेंबर २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी ;
(घ)	विद्यापीठाच्या शिफारशीनंतर, लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी	१५ फेब्रुवारी २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी ";

(२) पोट-कलम (४) मधील, खंड (घ) मध्ये, दुसरे परंतुक व तक्ता याऐवजी, पुढील परंतुक व तक्ता दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, २०२४- २०२५ या शैक्षणिक वर्षासाठी, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरू करण्यासाठी परवानगी मागण्याकरिता राज्य शासनाकडे अर्ज करण्याचा दिनांक वाढविण्याच्या दृष्टीने, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (४) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेला दिवस हा, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येईल :—

तक्ता

खंड	विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिवस	२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिनांक
(१)	(२)	(३)
(क)	ज्या वर्षी परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी	१५ नोव्हेंबर २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी.".

G-8117

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ यास जोडलेल्या अनुसूची क ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची क मधील भाग एक मध्ये, अनुक्रमांक ४ येथील नोंदीमध्ये,–

(१) स्तंभ (१) मधील, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद" या मजकुराऐवजी, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) स्तंभ (२) मधील,–

(एक) नोंद (१) मधील, "औरंगाबाद" या मजकुराऐवजी, "छत्रपती संभाजीनगर" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) नोंद (४) मधील, "उस्मानाबाद" या मजकुराऐवजी, "धाराशिव" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृत्ती.

२०२३ चा महा. अध्या. ८.

४. (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२३ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

G-8118

RNI No. MAHENG /2009/35528

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग आठ

वर्ष १०, अंक १(२)] बुधवार, जानेवारी ३, २०२४/पौष १३, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक २

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Public Universities (Amendment) Act, 2023 (Mah. Act No. II of 2024), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH WAGHOLE,
Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

MAHARASHTRA ACT No. II OF 2024.

(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 3rd January 2024).

An Act further to amend the Maharashtra Public Universities Act, 2016.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session;

Mah. VI of 2017. Mah. Ord. VIII of 2023.

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Public Universities Act, 2016, for the purposes hereinafter appearing; and, therefore, promulgated the Maharashtra Public Universities (Amendment) Ordinance, 2023, on the 20th October 2023;

G-8119

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Seventy fourth year of the Republic of India, as follows :—

Short title and commencement.

1. *(1)* This Act may be called the Maharashtra Public Universities (Amendment) Act, 2023.

(2) It shall be deemed to have come into force on the 20th October 2023.

Amendment of section 109 of Mah.VI of 2017.

2. In section 109 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (hereinafter referred to as "the principal Act"), Mah. VI of 2017.—

(1) in sub section *(3)*, in clause *(g)*, for the second proviso and the Table, the following proviso and the Table shall be substituted, namely:—

"Provided further that, with a view to extend the dates of, making application for seeking Letter of Intent for opening new college or institution of higher learning, scrutiny of application by Board of Deans and forwarding the same to the State Government and grant of Letter of Intent by the State Government for the academic year 2024-2025, the day or dates referred to in clauses *(a)*, *(c)* and *(d)* of sub-section *(3)*, as specified in column *(2)* of the Table given below, shall be read as provided in column *(3)* of the said Table:—

TABLE

Clauses	Day or date provided in existing provision	Day or date provided for Academic Year 2024-25
(1)	*(2)*	*(3)*
(a)	before the last day of September of the year preceding the year in which the permission is sought	on or before the 15th November 2023;
(c)	on or before the 30th day of November of the year in which such application is received by the university	on or before the 31st December 2023 ;
(d)	on or before the 31st January of the immediately following year after the recommendations of the university	on or before the 15th February 2024.";

(2) in sub-section *(4)*, in clause *(d)*, for the second proviso and the Table, the following proviso and the Table shall be substituted, namely:—

"Provided further that, with a view to extend the date of making application, for seeking permission to start a new course of study, subjects, faculties, additional divisions or satellite centers to the State Government for the academic year 2024-2025, the day referred to in clause *(a)* of sub-section *(4)*, as specified in column *(2)* of the Table given below, shall be read as provided in column *(3)* of the said Table :—

G-8120

TABLE

Clause	Day provided in existing provision	Date provided for Academic Year 2024-25
(1)	*(2)*	*(3)*
(a)	before the last day of September of the year preceding the year in which the permission is sought	on or before 15th November 2023.".

Amendment of Schedule A of Mah. VI of 2017.

3. In SCHEDULE A appended to the principal Act, in PART I, in entry at serial No. 4.—

(1) in column *(1)*, for the words "Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad" the words "Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chhatrapati Sambhajinagar" shall be substituted;

(2) in column *(2)*,—

(i) in entry *(1)*, for the word "Aurangabad" the words "Chhatrapati Sambhajinagar" shall be substituted;

(ii) in entry *(4)*, for the word "Osmanabad" the word "Dharashiv" shall be substituted.

Mah. Ord. VIII of 2023.

Repeal of Mah. Ord. VIII of 2023 and saving.

4. *(1)* The Maharashtra Public Universities (Amendment) Ordinance, 2023, is hereby repealed.

(2) Notwithstanding such appeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the corresponding provisions of the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004
EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.